Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
ISSN:-2231-5063 Available online at www.aygrt.isrj.net

RESEARCH PAPER

# सातवाहन काळातील सर्वात मोठे चैत्यगृह लेणी–कार्ला

*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

**सांराश :**

पुण्याहून जुन्या महामार्गाने मुंबईकडे जात असता लोणावळ्याच्या अलिकडे कार्ला फाटा लागतो. या फाट्यावर उजव्याबाजूने डोंगरावरील अवघड चढणीचा रस्ता पार करून पार्कींगजवळ गाडी लावून वर पायऱ्यांचा रस्ता चढूनच जावे लागते. पश्चिममुखी भव्य कार्ले लेणी समुह आहे. कार्ला हे शैलगृह प्राचीन काळातील सुप्रसिद्ध असे बौद्ध केंद्रापैकी एक मानले जाते. कार्ला गुंफा इंद्रायणी नदीच्या उत्तर दिशेस असलेल्या डोंगरावर १०० मी. उंचीवर कोरण्यात आल्या आहेत. भाजे लेणी समूह दक्षिणेस तर कार्ला लेण्या उत्तरेस असून दोघा स्थळांमध्ये ७ ते ८ कि. मी. अंतर आहे.

**प्रस्तावना :**

१६ गुहांचा हा समुह इ.स.पू. दुसरे शतक ते इ.स. सातव्या शतकापर्यंतच्या काळापर्यंत कोरला जात होता. ह्या लेण्यांमध्ये बौद्ध धम्माच्या हिनयान व महायान ह्या दोन्ही पंथांचा उत्कृष्ट अविष्कार येथील स्थापत्य कलेत दिसतो. या गुहासमुहात एक चैत्यगृह म्हणजे प्रार्थनागृह असून इतर सर्व विहार म्हणजे निवासाकरिता असलेल्या खोल्यांच्या आहेत. या लेणीसमूहांचे वैशिष्ट्ये म्हणजे सातवाहनांच्या काळात भारतभर कोरल्या गेलेल्या चैत्यागृहांच्या पुढे एक प्रशस्त असा व्हरांडा आहे. चैत्यगृहांमध्ये असलेल्या खांबाच्या दोन ओळी तीन भागात विभागणी केलेले स्तूपाच्या मागच्या बाजूस एकत्र आलेले आहेत.



भींतीलगतच्या या तीन भागांपैकी दोन्ही भागांचे छत सपाट आहे. तर मधल्या स्तूपासमोरील भागातील स्तंभांनी एका मोठ्या तुळईला आधार दिलेला आहे. हे छत अर्धगोलाकार असून ते स्तूपाच्या वर बसविले आहे. तसेच तुळईचे वरचे छत हे गजपृष्ठाकृती आहे. या छताला लाकडी तुळ्या जोडलेल्या आहेत. या चैत्यगृहाच्या निर्माणाकरिता सहाय्य करणाऱ्या दानशूर लोकांच्या नावांचा उल्लेख दिलेला आहे. त्यात राजकुमार, व्यापारी, व्यापाऱ्यांच्या श्रेणी, भिक्षू-भिक्षूणी, सर्वसामान्य श्रद्धावान स्त्री-पुरूष अशा वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या २७ लोकांच्या नावांचा येथील २२ शिलालेखातून उल्लेख केला आहे.[१]

कार्ले येथील मुख्य लेणी ही आठव्या क्रमांकाची असून ती चैत्यगृह प्रकारातील असून हीनयान काळातील आहे. या चैत्यगृहाची लांबी ३७.८७ मी. रूंदी १३.८० मी. व उंची १४.२ मी एवढी आहे. लेणीच्या समोरची ओवरी ही सव्वा पंधरा मी लांबीची व सव्वा चार मीटर रूंद आहे. आतल्या दरवाज्यावर तोरण काढण्यात आले आहे. हे चैत्यगृह ज्याच्या आश्रयाखाली कोरण्यात आले त्या भूतपालचा असा दावा आहे की कार्ला लेणी ही सर्व जंबुद्वीपात सर्वात्कृष्ट आहे. चंपाकार मंडप, नासिका, आयनाकार ओवरी अशी मूळ योजना असल्याचे लक्षात येते. समोर दोन सिंहस्तंभ होते. कारण आज फक्त डाव्या बाजूचाच स्तंभ शिल्लक आहे. १६ बाजूंच्या ह्या स्तंभाची उंची ४५ फूट

आहे. आकाराने मोठा व जाड असलेल्या या स्तंभावर ब्राह्मी लिपीमध्ये एक शिलालेख कोरण्यात आला आहे. स्तंभावर उल्टे कमळ असून त्यावर एक पायऱ्यांचा स्तंभशीर्ष असून त्यावर सारनाथच्या स्तंभाप्रमाणे चार सिंह विरूद्ध दिशेला तोंड करून उभे असल्याचे दाखविण्यात आले आहे.[२]

मुखदर्शन हे आयताकृती असून मध्यभागी असलेल्या दरवाज्याच्या दोन्ही अंगास उंच असे खांब आहेत. वर एक रूंद तुला व त्यावर पुन्हा दोन खांब आहेत. म्हणजेच खांबाचे काम दोन मजल्यात करण्यात आले आहे. वरच्या मजल्यावर लाकडी कामाचा प्रशस्त असा सज्जा असून समोरील भिंतीच्या आतील भागात लांब चौकोनी असा सोपा आहे. आत जाण्यासाठी तीन प्रवेशद्वार आहेत. यातील मधल्या दरवाज्यातून सरळ चैत्यगृहाच्या मंडपातच प्रवेश होत असतो तर आजुबाजूच्या दोन्ही दरवाज्यातून बाजूच्या नासिकांमध्ये प्रवेश होत असतो. मधल्या दरवाज्यावर तोरण व सुंदर मूर्तीकाम करण्यात आले आहे. सांची, नासिक आणि अजिंठा प्रमाणेच या चैत्यगृहाचे मजले व सज्जे सजविण्यात आले आहेत तर त्याचपद्धतीचे कोरीव काम करण्यात आले आहे. समोरच्याच भिंतींच्या खालच्या बाजूस हत्तीची मोठी रांग आहे. या पद्धतीचे हत्तीचे शिल्प वेरूळ आणि चाळीसगावजवळच्या पितळखोरा लेण्यांमध्येही दाखविण्यात आले आहे. याचा अर्थ असा की सर्व चैत्यगृहाचा भार हा ह्या हत्तींवर असल्याचे शिल्पकाराला दर्शविण्याचे होते. अर्थात आपल्या या निर्मितीमधील हा भास सिद्ध करण्यात शिल्पकाराला यश मिळाले आहे.

आतील भागात संपूर्ण दगडात अर्धवर्तुळाकार कोरलेला स्तूप आहे. वरील हर्मिकांचे छत लाकडी आहे. छतावर ३१ लाकडी तुळ्या बसविण्यात आल्या आहेत. सभामंडपात दोन्ही बाजूंना बरोबर रांगेत तीस स्तंभ आहेत. स्तूपाभेवती प्रदक्षिणा मार्ग असून याच मार्गांमध्ये ७ स्तंभ आहेत. या सर्व स्तंभावर सुंदर चित्रशिल्प कोरण्यात आलेली आहेत.[३]

या स्तंभांच्या वरच्या पाट्यांवर सिंह, हत्ती व घोडे या प्राण्यांची शिल्पे कोरलेली आहेत. बाजुच्या भिंतीवरील अवशेष पाहता विविध रंगाने चित्रे काढले असल्याचा प्रत्यय येतो. प्रवेशद्वाराच्या भिंतीवर प्राण्यांचे सुंदर शिल्पे कोरण्यात आली आहेत. प्रारंभीच अष्टकोनी ध्वजस्तंभ आहेत. भिंतीवर उभे असलेल्या हत्तीच्या खाली जाळीदार नक्षीकाम केलेले आहे. सभामंडपात प्रकाश व हवा येण्यासाठी गवाक्ष कोरण्यात आला आहे. आतील नक्षीकामात साधेपणा असून भोवताली कुंपन कोरण्यात आले आहे. चैत्यगृहात बुद्धाच्या अनेक मूर्त्या असून मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूस बुद्धाला सिंहासनावर बसविलेला दाखविण्यात आले आहे. चैत्यगृहातील शिलालेखांमध्ये दानकर्त्यांच्या नावांचा उल्लेख केला आहे. वनवासी, उत्तर कानडा जिल्हा म्हणजेच कार्लाच्या दक्षिणेस ६०० कि.मी. असलेले तर १०० कि.मी. असलेले नालासोपारा येथील दानकर्त्यांचा उल्लेख शिलालेखंमध्ये दिला आहे. तर



उमेहनकट, धेनुकाकट सारख्या ठिकाणांचा काही अर्थबोध होत नसला तरी धेनुकाकट या ठिकाणचे बहुतेक दानकर्ते हे ग्रीक असल्याचे स्पष्ट होते. ह्या चैत्यगृहाच्या डाव्या अंगास भव्य विहार आहे. त्यात मोठी बौद्ध मूर्ती असून कमळाखालील दोन हरीणांमध्ये धम्मचक्र आहे. ह्या गुहासमुहांच्या समोर भव्य प्रांगण आहे. चैत्यगृहाच्या समोरच नंतरच्या काळात एकवीरा देवीच्या मूर्तीची आणि मंदिराची उभारणी करण्यात आली असल्याने निम्मेहून जास्तीचा भाग चैत्यगृहाच्या प्रवेशाचा झाकला जातो. लेण्या हा भारतीय पुरातत्त्व विभागाच्या संरक्षित वास्तू असल्यामुळे शासनाच्या नियमांच्या अधीन राहून ५.३० वाजता लेण्यासमुह बंद होत असतो. मात्र देवीच्या मंदिरात येणाऱ्या भक्तांमुळे हा परीसर रात्री ६.०० वाजेपर्यंत वर्दळीचाच असतो.[४]

*संदर्भ :*


१)भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, माहिती फलक, मुंबई विभाग, मुंबई, ऑगस्ट २००६.

२)कठारे डॉ. अनिल, साखरे प्रा. विजया, भारतीय कलेचा इतिहास, कल्पना प्रकाषन, नांदेड, २००८, पृ. १२५.

३)तत्रैव, पृ. १२६

४)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. ८ नोव्हेंबर, २०१०





*अनिल माणिकराव बैसाणे*

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

